# दि कल्याण जनता सहकारी बँक लि. (मल्टीस्टेट शेडयुल्ड बँक)
## ४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

रविवार, दि. २२.०९.२०१९ रोजी बँकेची ४६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नवरंग बँक्वेट हॉल, फोर्टीस हॉस्पिटलजवळ, बैलबाजार, कल्याण (प.) येथे सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

सकाळी ठीक १०.०० वाजता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांनी जाहीर केले की, सभेस आवश्यक ती गणसंख्या नाही, सबब सभा अर्धा तास तहकुब केली जात आहे. सदर सभा अर्ध्या तासानंतर म्हणजे ठीक १०.३० वाजता सुरु होईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही. त्यानंतर सकाळी ठीक १०.३० वाजता सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांनी सर्व उपस्थितांचे हार्दिक स्वागत करुन सभेची सूचना वाचून दाखविली.

सभेच्या सुरुवातीस मा. अध्यक्ष ॲड. श्री. सुरेश पटवर्धन यांनी सर्व सभासदांचे स्वागत केले व दुखवटयाचा ठराव मांडण्याची विनंती बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. मधुसूदन पाटील यांना केली.

यानंतर बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. मधुसूदन पाटील यांनी अहवाल सालात देवाज्ञा झालेल्या मान्यवर व्यक्ती व सभासद यांच्या नावांचे वाचन केले. त्यानंतर मा. अध्यक्ष ॲड. श्री. सुरेश पटवर्धन यांनी अहवाल सालात दिवंगत झालेले बँकेचे दोन संस्थापक संचालक कै. ॲड. श्रीधर सबनीस व कै. नारायण भोईर, यांच्याविषयी मनोगत व्यक्त करण्याची विनंती बँकेचे माजी संचालक मा. प्रा. श्री. अशोक प्रधान यांना केली. मा. श्री. अशोक प्रधान यांनी कै. श्रीधर सबनीस व कै. नारायण भोईर यांच्या कार्याची व त्यांनी बँकेच्या स्थापनेमध्ये दिलेल्या योगदानाची माहिती सभेपुढे मांडली व त्यांना आदरांजली अर्पण केली.

त्यानंतर बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. मधुसूदन पाटील यांनी अहवाल सालात देवाज्ञा झालेल्या मान्यवर व्यक्ती व सभासद यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सूचित केले व सर्वांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहण्याची विनंती केली.

**ठराव क्र. १ : दुखवटयाचा ठराव -**

अहवाल सालात ज्या मान्यवरांचे व सभासदांचे निधन झाले त्यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून ही सभा श्रध्दांजली वाहत आहे.

माजी पंतप्रधान भारतरत्न - अटलबिहारी वाजपेयी, संसदीय कार्य, रसायने व खते खात्याचे केंद्रीय मंत्री - अनंत कुमार, छत्तीसगडचे राज्यपाल - बलरामजीदास टंडन, गोव्याचे मुख्यमंत्री व माजी संरक्षणमंत्री - मनोहर पर्रीकर, लोकसभेचे माजी अध्यक्ष व कम्युनिस्ट नेते - सोमनाथ चॅटर्जी, भारताचे माजी अर्थमंत्री, संरक्षणमंत्री - अरुण जेटली, भारताच्या माजी परराष्ट्र मंत्री - सुषमा स्वराज, माजी संरक्षणमंत्री व कामगार नेते - जॉर्ज फर्नांडिस, माजी केंद्रीय मंत्री - आर के. धवन, माजी केंद्रीय मंत्री - गुरुदास कामत, माजी केंद्रीय कायदा मंत्री - ॲड. राम जेठमलानी, माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री - शांताराम पोटदुखे, माजी केंद्रीय मंत्री - जयपाल रेड्डी, तामिळनाडू आणि आसाम राज्याचे माजी राज्यपाल - भिष्मनारायण सिंग, दिल्लीचे माजी मुख्यमंत्री, राजस्थानचे माजी राज्यपाल मदनलाल खुराणा, तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री - एम् करुणानिधी, उत्तर प्रदेश व उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री - नारायणदत्त तिवारी, दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री - शीला दीक्षित, बिहारचे माजी मुख्यमंत्री - जगन्नाथ मिश्रा, मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री - बाबुलाल गौर, विधान परिषदेचे माजी सभापती, माजी मंत्री -शिवाजीराव देशमुख, क.डों.म.पा. च्या माजी महापौर - कल्याणीताई पाटील, मुंबईचे माजी नगरपाल - नाना चुडासामा, दलित पँथरचे नेते - राजा ढाले, प्रख्यात क्रिकेटपटू - अजित वाडेकर, अभिनेते - विजय चव्हाण, दिग्दर्शिका - कल्पना लाजमी, ख्यातनाम लेखिका - कविता महाजन, सुप्रसिद्ध हार्मोनियम व ऑर्गनवादक - पं तुळशीदास बोरकर, गीतकार व ज्येष्ठ संगीतकार - यशवंत देव, प्रसिद्ध व्हायोलियन वादक - पंडित डी. के. दातार, ज्येष्ठ अभिनेत्री - लालन

सारंग, जाहिरात तज्ज्ञ - अलेक् पदम्सी, ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक - मृणाल सेन, ज्येष्ठ अभिनेते, संवाद लेखक - कादर खान, क्रिकेटगुरु पद्मश्री - रमाकांत आचरेकर, ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत - न्या चंद्रशेखर धर्माधिकारी, ज्येष्ठ अभिनेते - किशोर प्रधान, विश्व हिंदु परिषदेचे माजी अध्यक्ष - विष्णु हरी दालमिया, अभिनेता - रमेश भाटकर, संत साहित्याचे अभ्यासक -यशवंत पाठक, ज्ञानपीठ विजेते लेखक, दिग्दर्शक-गिरीश कर्नाड, वस्तु संग्रहालय तज्ज्ञ - सदाशिव गोरक्षकर, सामाजिक कार्यकर्त्या व लेखिका - निर्मला पुरंदरे, अभिनेत्री - विद्या सिन्हा, ज्येष्ठ संगीतकार - खय्याम, ग्राहक चळवळीचे कार्यकर्ते - अरुण गुजराथी, योगाचार्य - श्रीकृष्ण व्यवहारे, ज्येष्ठ लेखक -किरण नगरकर, ज्येष्ठ पत्रकार - कुलदिप नय्यर, चित्रपट निर्माता - राजकुमार बडजात्या, गोवा मुक्ती संग्रामाचे नेते - मोहन रानडे, अर्थतज्ज्ञ व रिझर्व्ह बँकेचे माजी डेप्युटी गव्हर्नर - सुबीर गोकर्ण, पहिल्या महिला DGP - कांचन चौधरी, ज्ञानपीठ विजेते हिंदी साहित्यिक - कृष्णा सोबती, हिंदी समालोचक -जसदेव सिंग, उद्योजक - बी. के. बिर्ला, बँकेचे संस्थापक संचालक, कल्याणातील ख्यातनाम वकील ॲड. श्रीधर तथा भाऊराव सबनीस, बँकेचे संस्थापक संचालक - ना. ध. भोईर

## दिवंगत सभासदांची यादी

| क्र. | सभासद क्रमांक | नाव | मृत्यु दिनांक |
|---|---|---|---|
| 1 | 41916 | अहिरे दिलीप मांगु | 04.01.2018 |
| 2 | 38962 | रोचलानी प्रताप माधवदास | 23.01.2018 |
| 3 | 41611 | गोंधळेकर मनोहर भिकाजी | 29.01.2018 |
| 4 | 28674 | लोबो जेसी बेंजामीन | 01.02.2018 |
| 5 | 176 | मुल्ला मोहम्मद याकुब | 11.02.2018 |
| 6 | 7999 | नायडू दयानंद वीरस्वामी | 19.02.2018 |
| 7 | 22625 | धुमाळे भगवान तोराप्पा | 02.03.2018 |
| 8 | 7442 | सुतार रामचंद्र कृष्णा | 04.03.2018 |
| 9 | 35379 | शर्मा रामेश्वरप्रसाद किसनलाल | 05.03.2018 |
| 10 | 64510 | जेठानी गोवर्धन चंचलदास | 17.03.2018 |
| 11 | 64210 | राऊत राजेंद्र एकनाथ | 19.03.2018 |
| 12 | 44851 | सोनवणे किसन महादेव | 29.03.2018 |
| 13 | 25450 | सरकटे सुरेश संपत | 30.03.2018 |
| 14 | 27103 | शेखावत मोहनसिंग | 11.04.2018 |
| 15 | 27565 | कदम परशुराम हरी | 19.04.2018 |
| 16 | 1589 | गोडबोले वर्षा विलास | 29.04.2018 |
| 17 | 4647 | पाटील काका शंकर | 14.05.2018 |
| 18 | 1854 | हरावडे बबन गोविंद | 15.05.2018 |
| 19 | 40623 | कारेकर नामदेव तुकाराम | 17.05.2018 |
| 20 | 19285 | गोडबोले ललीता नारायण | 21.05.2018 |
| 21 | 37803 | सोनी नंदकिशोर रामजीवन | 23.05.2018 |
| 22 | 35400 | जोशी सुनंदा दत्तात्रय | 27.05.2018 |

| | | | |
|---|---|---|---|
| 23 | 18841 | भडसाळकर महेश मधुसुदन | 30.05.2018 |
| 24 | 19399 | पाटील विनायक भोणा | 01.06.2018 |
| 25 | 17928 | कुलश्रेष्ठ सुशिल प्रकाश | 01.06.2018 |
| 26 | 5265 | आंबवणे रविंद्र गोविंद | 13.06.2018 |
| 27 | 46418 | राऊत अनिता शंकर | 13.06.2018 |
| 28 | 43063 | आपटे हर्षद दत्तात्रय | 16.06.2018 |
| 29 | 16928 | पाटील शंकर सिताराम | 18.06.2018 |
| 30 | 67087 | दीक्षित विनायक गंगाधर | 23.06.2018 |
| 31 | 41006 | जामघरे गणेश शिवराम | 03.07.2018 |
| 32 | 37090 | भोईर मनिषा धनाजी | 07.07.2018 |
| 33 | 3817 | जोशी लतिका नरहर | 07.07.2018 |
| 34 | 56220 | चिकणे प्रकाश बाळू | 12.07.2018 |
| 35 | 24668 | पांडे सुरेंद्र कमला | 17.07.2018 |
| 36 | 20983 | पांगारकर शालिनी शंकर | 19.07.2018 |
| 37 | 34500 | ढोले आनाजी सावळाराम | 19.07.2018 |
| 38 | 14370 | प्रसादे मिलींद मनोहर | 20.07.2018 |
| 39 | 26965 | चव्हाण शांता केशव | 23.07.2018 |
| 40 | 41129 | बागडे संजय गोपाल | 29.07.2018 |
| 41 | 48631 | भोसले द्रौपदी दादासाहेब | 31.07.2018 |
| 42 | 896 | पिसोळकर पद्माकर दत्तात्रय | 03.08.2018 |
| 43 | 3685 | गाडगीळ श्रीधर नरहर | 04.08.2018 |
| 44 | 19862 | पाटील माणिकराव गंगाधर | 07.08.2018 |
| 45 | 15333 | केळकर माधव कृष्णाजी | 09.08.2018 |
| 46 | 53321 | भावसार रमेश दशरथ | 09.08.2018 |
| 47 | 6662 | मोरे रघुनाथ सजन | 15.08.2018 |
| 48 | 210 | पाध्ये प्रेमा गजानन | 17.08.2018 |
| 49 | 43151 | नानल विनया विनोद | 20.08.2018 |
| 50 | 28216 | पाठक गोविंद दत्तात्रय | 21.08.2018 |
| 51 | 22162 | धोका हंसराज गुलाबचंद | 25.08.2018 |
| 52 | 30205 | गुरंग लोकबहादुर | 29.08.2018 |
| 53 | 24711 | सेटटू सडियन् | 30.08.2018 |
| 54 | 31267 | जाधव गणेश विठ्ठल | 31.08.2018 |
| 55 | 5191 | तपासे अरुण छगन | 06.09.2018 |
| 56 | 46548 | बेंद्रे शिल्पा केशव | 06.09.2018 |
| 57 | 2393 | शफिक अहमद सुलतान शेख | 06.09.2018 |
| 58 | 53907 | सोनोने भगवान किसन | 14.09.2018 |
| 59 | 56131 | पुण्यार्थी रमाकांत गुरूनाथ | 18.09.2018 |

| | | | |
|---|---|---|---|
| 60 | 49563 | प्रभुणे जयकांत मुरलीधर | 18.09.2018 |
| 61 | 43277 | मेहता भरत मनसुखलाल | 21.09.2018 |
| 62 | 23631 | डिगे महादेव बाळू | 21.09.2018 |
| 63 | 32095 | सैनी गुरदिप सिंग | 22.09.2018 |
| 64 | 19077 | लिमये माधव त्रिंबक | 22.09.2018 |
| 65 | 36329 | कोल्हटकर चंद्रशेखर रघुनाथ | 23.09.2018 |
| 66 | 60404 | महाडिक बाळकृष्ण सखाराम | 24.09.2018 |
| 67 | 46839 | पटेल मनुभाई छोटाभाई | 26.09.2018 |
| 68 | 6949 | ठाकरे रामचंद्र दत्तात्रय | 03.10.2018 |
| 69 | 27426 | चव्हाण नलिनी बावा | 02.10.2018 |
| 70 | 14653 | शिंदे नारायण कोंडीबा | 25.10.2018 |
| 71 | 66297 | मिश्रा विशाल नंदकुमार | 25.10.2018 |
| 72 | 39909 | बागवे सुमन बाबुराव | 27.10.2018 |
| 73 | 56 | गांगल अनंत नारायण | 28.10.2018 |
| 74 | 53139 | शिरसकर सुमन लक्ष्मण | 31.10.2018 |
| 75 | 5618 | अभ्यंकर श्रीधर दामोदर | 01.11.2018 |
| 76 | 42205 | आरोंदेकर श्रीधर सखाराम | 04.11.2018 |
| 77 | 21336 | गोगटे शरद विश्वनाथ | 04.11.2018 |
| 78 | 44949 | भांडारकर सुधाकर रघुनाथ | 08.11.2018 |
| 79 | 23476 | आंबटकर अशोक नारायण | 08.11.2018 |
| 80 | 56386 | मुल्लाणी गजबर महंमदरफीक | 17.11.2018 |
| 81 | 66199 | गुरव प्रकाश बापु | 27.11.2018 |
| 82 | 7047 | साने उषा वसंत | 27.11.2018 |
| 83 | 10500 | आमले जगन गोविंद | 29.11.2018 |
| 84 | 46741 | फडणीस स्नेहल सुनिल | 30.11.2018 |
| 85 | 54415 | दळवी सुरेश दुंदाराम | 02.12.2018 |
| 86 | 12076 | दराडे रविंद्र नामदेव | 08.12.2018 |
| 87 | 47701 | पोळ सतीश विष्णु | 11.12.2018 |
| 88 | 29599 | बागलाणे अरुण पद्माकर | 11.12.2018 |
| 89 | 41807 | कुलकर्णी मनोहर बाबुराव | 12.12.2018 |
| 90 | 41249 | उदागे अशोक दगडू | 13.12.2018 |
| 91 | 983 | घाटे मनोहर गणेश | 14.12.2018 |
| 92 | 3424 | लिमये उज्वला हरी | 14.12.2018 |
| 93 | 40928 | पराडकर रामानंद भिकाजी | 14.12.2018 |
| 94 | 39811 | करंदीकर सुहास माधव | 15.12.2018 |
| 95 | 18367 | पवार संजय दिनकर | 18.12.2018 |
| 96 | 4012 | शिरसाठ श्रावण खंडू | 21.12.2018 |

| | | | |
|---|---|---|---|
| 97 | 19640 | वाव्हळ चारुशीला श्रीकृष्ण | 30.12.2018 |
| 98 | 11222 | कदम सीताराम शिवराम | 30.12.2018 |
| 99 | 22605 | मेनन के.पी.एस | 31.12.2018 |
| 100 | 36748 | केंग यशवंत भोरु | 03.01.2019 |
| 101 | 946 | जोशी विनायक नारायण | 04.01.2019 |
| 102 | 10929 | जोशी नारायण बाळकृष्ण | 08.01.2019 |
| 103 | 19639 | वाव्हळ श्रीकृष्ण नारायण | 09.01.2019 |
| 104 | 42809 | भिडे विजया माधव | 19.01.2019 |
| 105 | 23529 | कारिआ देवेन अश्विनकुमार | 15.01.2019 |
| 106 | 34525 | अतीतकर संजय मधुसुदन | 17.01.2019 |
| 107 | 46968 | भांडारकर विजय माधव | 23.01.2019 |
| 108 | 26183 | घाटे माधुरी मनोहर | 25.01.2019 |
| 109 | 53283 | एकतारे अनंत विश्वनाथ | 02.02.2019 |
| 110 | 6830 | अहिरे उत्तम पुंडलिक | 04.02.2019 |
| 111 | 56704 | कुलकर्णी मेघना रमेश | 05.02.2019 |
| 112 | 44880 | संभूस श्रीकृष्ण विश्वनाथ | 05.02.2019 |
| 113 | 31707 | पी .नटराजन | 06.02.2019 |
| 114 | 23199 | पारचे शामु बाबुलाल | 08.02.2019 |
| 115 | 24617 | राव के. रामचंद्र | 13.02.2019 |
| 116 | 42845 | लोकवानी मदनलाल सिरुमल | 13.02.2019 |
| 117 | 43231 | मलबारी माधुरी पद्माकर | 14.02.2019 |
| 118 | 67167 | हाटले समिधा सत्यवान | 15.02.2019 |
| 119 | 13870 | हुसेनखान फतेहखान | 18.02.2019 |
| 120 | 57098 | बिरवाडकर शारदा नरेंद्र | 21.02.2019 |
| 121 | 55541 | गौडा सिंधू शंकर | 24.02.2019 |
| 122 | 45457 | कल्याणकर शोभा चंद्रकांत | 01.03.2019 |
| 123 | 36538 | शिंदे शेखर कारभारी | 06.03.2019 |
| 124 | 11303 | कुलकर्णी लक्ष्मण निलकंठ | 14.03.2019 |
| 125 | 22725 | देशपांडे प्रभाकर दत्तात्रय | 15.03.2019 |
| 126 | 47588 | विद्वांस विनिता विजय | 20.03.2019 |
| 127 | 68991 | पोतदार अपर्णा अनिल | 16.03.2019 |
| 128 | 34215 | घाडी रमेश सदाशिव | 17.03.2019 |
| 129 | 25922 | दुबे पद्मजा रमेशकुमार | 17.03.2019 |
| 130 | 28151 | शिंपी दिनकर श्रीधर | 21.03.2019 |
| 131 | 7876 | चौधरी नरेंद्र एकनाथ | 26.03.2019 |
| 132 | 43200 | जोशी अरुण गुंडो | 04.04.2019 |
| 133 | 6497 | पवार शंकर बाजीराव | 07.04.2019 |

| | | | |
|---|---|---|---|
| 134 | 12207 | मोरे प्रदीप विठ्ठल | 09.04.2019 |
| 135 | 48184 | वडनेरे रजनी प्रमोद | 09.04.2019 |
| 136 | 46966 | गोसावी शुभदा दिलरुबा | 13.04.2019 |
| 137 | 26175 | कांबळे गणपती ज्ञानू | 18.04.2019 |
| 138 | 40078 | अवघडे निरंजन बबनराव | 19.04.2019 |
| 139 | 47574 | सोनटक्के प्रभा अशोक | 23.04.2019 |
| 140 | 47767 | बाऊस्कर दत्तात्रय रंगू | 30.04.2019 |
| 141 | 15909 | कुलकर्णी संजय दत्तात्रय | 13.05.2019 |
| 142 | 65280 | वेदरे महेश चंद्रकांत | 16.05.2019 |
| 143 | 31976 | गरुडे दिनकर शंकर | 17.05.2019 |
| 144 | 43822 | हरदास वसंतराव पांडुरंग | 17.05.2019 |
| 145 | 65881 | भगत राजेश हरिश्चंद्र | 24.05.2019 |
| 146 | 2501 | देशपांडे भास्कर शिवराव | 25.05.2019 |
| 147 | 47480 | तिवारी शीला हौसिलाप्रसाद | 26.05.2019 |
| 148 | 45136 | रावडे परशुराम सिताराम | 02.06.2019 |
| 149 | 41612 | गोंधळेकर सुजाता मनोहर | 02.06.2019 |
| 150 | 10451 | जाधव बबन लक्ष्मण | 07.06.2019 |
| 151 | 6521 | जोशी अभय विश्वनाथ | 09.06.2019 |
| 152 | 41621 | कुलकर्णी शुभदा लक्ष्मीकांत | 21.06.2019 |
| 153 | 697 | शाह मनोहर मणिलाल | 06.07.2019 |
| 154 | 48537 | शर्मा मोहनलाल एम | 19.07.2019 |
| 155 | 50983 | गावित चंदर जानू | 21.07.2019 |
| 156 | 23047 | करमरकर विष्णु दिनकर | 02.08.2019 |
| 157 | 15374 | केळकर श्रीराम विनायक | 15.09.2019 |
| 158 | 88 | जोशी मालिनी मधुसूदन | 15.09.2019 |

यानंतर मा. अध्यक्षांनी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल सादर करण्यापूर्वी सभासदांशी संवाद साधताना सांगितले की, विद्यमान संचालक मंडळ २०१५ पासून कार्यरत आहे. ही त्यांची पाचवी वार्षिक सर्वसाधारण सभा आहे. सर्वच सभासद सहकार्याच्या भावनेतून बँकेला सहकार्य करत असतात. त्यामुळे त्यांनी सर्वच सभासदांना धन्यवाद दिले.

दृक्श्राव्य माध्यमातून सन २०१८-१९ चा आर्थिक अहवाल सभेपुढे मांडण्यापूर्वी अध्यक्षांनी काही गोष्टींचा खुलासा केला. गेली दोन वर्षे काही सभासदांकडून मागील वर्षाच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तास मंजुरी आणि अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय ह्या दोन विषयांचा विषयपत्रिकेत समावेश का होत नाही अशी विचारणा होत आहे. याबाबत खुलासा करताना मा. अध्यक्षांनी सांगितले की २०१७ व २०१८ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत याबाबत खुलासा केलेला होता. परंतु पुन्हा एकदा विशद करतो की मार्च २०१७ मध्ये बँकेस मल्टिस्टेट को-ऑप बँकेचा दर्जा प्राप्त झाला. त्याबरोबर मल्टीस्टेट को-ऑप. कायदा लागू झाला आहे. या कायद्याच्या कलम ३९ आणि बँकेचा उपविधी क्र. २७ या दोन्हीनुसार, वार्षिक सर्वसाधारण सभेत कोणत्या विषयांचा समोवश करावा हे निश्चित करण्यात आले आहे आणि यात मागील वर्षाच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तास मंजुरी आणि आयत्या वेळचे विषय या दोन्ही विषयांचा समावेश नाही. त्यामुळे विषय पत्रिकेमध्ये आपण या दोन विषयांचा समावेश करीत नाही. तसेच इतिवृत्ताबाबत नेहमी विचारणा होत असते. मल्टिस्टेट को-ऑप कायद्याच्या

कलम ११० व बँकेच्या उपविधी क्र. ३३ नुसार वार्षिक सर्वसाधारण सभेपासून ३० दिवसांच्या आत इतिवृत्त हे संचालक मंडळाने मंजूर करावयाचे असते. मंजूर केलेले इतिवृत्त बँकेच्या वेबसाईटवर उपलब्ध केले जाते. त्याचप्रमाणे शाखांमधून इतिवृत्ताच्या प्रति सभासदांना उपलब्ध करुन दिलेल्या असतात. याच कलम ११० च्या उपकलम ७ नुसार इतिवृत्तात कोणत्या गोष्टींचा समावेश करायचा व कोणत्या गोष्टींचा समावेश करायचा नाही याचे संपूर्ण अधिकार वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षांना देण्यात आलेले आहेत. त्यामुळे त्याचा सांगोपांग विचार करुन इतिवृत्त तयार केले जाते.

पुढे बोलताना मा. अध्यक्षांनी सांगितले की अजून एक प्रश्न सभासदांकडून विचारला जात आहे तो म्हणजे गेल्या २-३ वर्षांपासून बँक पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था करते. सभासदांना घाबरवण्यासाठी हे केले जात नाही, याचा खुलासा करताना मा. अध्यक्षांनी सांगितले की, सभासद बहुसंख्येनी सभेस उपस्थित राहतात, कामकाजात भाग घेतात. परंतु कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये आणि कुठलाही कटू प्रसंग उद्‌भवू नये व उद्‌भवल्यास सभेचे कामकाज सुरळीतपणे पार पडण्याकरिता बँक पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था करते.

यानंतर दृक्‌श्राव्य माध्यमातून मा. अध्यक्षांनी अहवाल सालातील बँकेचा आर्थिक आढावा सभेपुढे सादर केला. सुरुवातीस सभासद श्री. अरुण शिंपी यांनी इतिवृत्ताबाबत काही प्रश्न उपस्थित करण्यास सुरुवात केली. तेव्हा मा. अध्यक्षांनी विषय मांडून झाल्यावर प्रश्न विचारण्यास सांगितले.

त्यानंतर मा. अध्यक्षांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा सभेसमोर सादर केला.

**विषय : संचालक मंडळाने सादर केलेल्या दि. ३१.०३.२०१९ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या अहवालाची नोंद घेणे. तसेच सन २०१९-२० च्या अंदाजपत्रकाची नोंद घेणे.**

मार्च, २०१९ अखेर बँकेचा एकत्रित व्यवसाय ₹ ५१७६ कोटी झाला असल्याचे मा. अध्यक्षांनी सांगितले. तसेच सन २०२० पर्यंत एकत्रित व्यवसाय ₹ ५४०० कोटींपेक्षा जास्त करण्याचे बँकेचे उद्दिष्ट असून, त्यादिशेने बँकेची वाटचाल सुरु असल्याचे सांगितले. त्यानंतर दृक्‌श्राव्य माध्यमातून मा. अध्यक्षांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा सभेसमोर सादर केला.

सन २०१७-१८ मध्ये भागभांडवल ₹ ७६.२५ कोटी होते. त्यात ₹ ३४.५९ कोटींची वाढ होऊन सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात बँकेचे भागभांडवल ₹ ११०.८४ कोटी इतके झाले आहे. ४५.३६ % ने भागभांडवल वाढले आहे. राखीव निधी ₹ १८०.५२ कोटींवरुन ₹ १८२.३९ कोटी झाले आहेत. राखीव निधीत १.०४% नी वाढ झाली आहे. २०१७-१८ मध्ये सभासद संख्या ५५१५३ एवढी होती. २०१८-१९ मध्ये सभासद संख्या १४९५ ने वाढून ५६६४८ झाली आहे.

बँकेच्या एकूण ठेवी २०१७-१८ या आर्थिक वर्षाखेरीस ₹ २८१४.०२ कोटी होत्या. त्यामध्ये वाढ होऊन २०१८-१९ आर्थिक वर्षअखेर ₹ ३०४३.४८ कोटी इतक्या झाल्या आहेत. ठेवींमध्ये ८.१५% वाढ झालेली आहे. बँकेची एकूण कर्जे २०१७-१८ अखेर ₹ २०२६.६२ कोटी होती. त्यामध्ये वाढ होऊन २०१८-१९ अखेर एकूण कर्जे ₹ २१३२.५१ कोटी इतकी झाली आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत कर्जांमध्ये ५.२३% इतकी वाढ झाली आहे.

बँकेचा निव्वळ नफा सन २०१७-१८ साली ₹ २०.२९ कोटी होता, सन २०१८-१९ यावर्षी निव्वळ नफा ₹ २०.५५ कोटी इतका झालेला आहे. नफ्यामध्ये १.२८ % वाढ झालेली आहे.

सन २०१७-१८ साली प्रती कर्मचारी उत्पादकता ₹ ९.०६ कोटी होती त्यामध्ये वाढ होऊन यावर्षी ती ₹ ९.८४ कोटी इतकी झाली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार भांडवल पर्याप्तता (Capital Adequacy) प्रमाण ९% पेक्षा अधिक असले पाहिजे. बँकेने २०१८-१९ अखेर भांडवल पर्याप्तता प्रमाण १२.४६% इतके राखलेले आहे. बँकेने सातत्याने रिझर्व्ह बँकेने घालून दिलेले भांडवल पर्याप्ततेचे निकष पूर्ण केले आहेत.

सन २०१७-१८ मध्ये बँकेच्या ढोबळ अनुत्पादित कर्जाचे (Gross NPA) प्रमाण ५.७१% पर्यंत होते. तर निव्वळ अनुत्पादित कर्जे (Net NPA) ३.७७% होती. ढोबळ व निव्वळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण कमी होऊन ह्यावर्षी अनुक्रमे ३.६७% व २.०५% एवढे झाले आहे.

आपल्या बँकेचा एकत्रित व्यवसाय (Mix Business) सन २०१७-१८ अखेरीस ₹ ४८४१ कोटी होता तो वाढून सन २०१८-१९ अखेरीस ₹ ५१७६ कोटी इतका झालेला आहे.

लेखापरीक्षण व तपासणी याबाबत माहिती देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की, मे. किर्तने अँड पंडीत, एल. एल. पी. यांनी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता बँकेस 'अ' वर्ग दिला आहे.

तंत्रज्ञान विभागाबाबत माहिती देतांना मा. अध्यक्षांनी सांगितले की, आपल्या बँकेने तंत्रज्ञानाचा वापर अतिशय चांगल्या प्रकारे केलेला आहे. पुण्याच्या आपल्या क्षेत्रीय कार्यालयामध्ये आपण व्हिडिओ कॉन्फरंसिंगद्वारे संपर्क साधतो, ही सुविधा उपलब्ध झाली आहे.

बँकिंग सेवेव्यतिरिक्तही अन्य काही सेवा आपली बँक ग्राहकांना देत आहे. त्यापैकी एक म्हणजे Franking. ही सेवा काळातलाव शाखेमार्फत दिली जाते. अहवाल सालात ५९७९५ दस्तऐवज नोंदवले असून त्यापोटी बँकेस ₹ ६.१० लाख इतके उत्पन्न मिळाले आहे.

बँक २०११ पासून कोटक लाईफ इन्शुरन्स व २०१४ पासून दि न्यु इंडिया अॅश्युरन्स कं. या विमा कंपनींचे कॉर्पोरेट एजंट म्हणून कार्यरत आहे. विम्याच्या या दोन्ही क्षेत्रामध्ये बँकेने सातत्याने व्यवसाय वृध्दी नोंदविलेली आहे. जीवन विम्यापोटी ९३४ विमा पॉलिसींतून ₹ ३०६.४८ लाख रकमेचे विमा हप्ते आणि इतर सर्वसाधारण विम्यापोटी ११९५ पॉलिसींतून ₹ ७९.२१ लाख इतकी विमा प्रिमियम रक्कम बँकेने अहवाल वर्षात जमा केली आहे. या दोन्ही प्रकारच्या विमा व्यवसायातून बँकेने यंदाचे वर्षी प्रथमच एक कोटीची म्हणजे ₹ १०४.६८ लाख इतकी रक्कम कमिशनपोटी मिळविली.

त्याचप्रमाणे भारत सरकारतर्फे सुरु करण्यात आलेल्या प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना व प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना यांचा खातेदारांनी मोठया प्रमाणात लाभ घेतला आहे. प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजनेचा लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियामार्फत ४७३९ खातेदारांनी लाभ घेतला. त्यापोटी ₹ १३.६३ लाख विमा हप्ता रक्कम भरली आहे. तसेच प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेचा न्यू इंडिया अॅश्युरन्स कंपनीमार्फत १००४३ खातेदारांनी लाभ घेतला. त्यापोटी ₹ १.२० लाख विमा हप्ता रक्कम भरण्यात आली आहे.

**पुरस्कार :** यानंतर अहवाल वर्षात बँकेला जे विविध पुरस्कार मिळाले त्याबद्दलची माहिती मा. अध्यक्षांनी सभेस दिली.

१) **Best Bank & Best Technology - "बँको"** या मासिकातर्फे मोठया सहकारी बँकांच्या विभागात बँकेला सन २०१७-१८ करिता '**Best Bank**' म्हणून दुसऱ्या क्रमांकाचे बक्षिस मिळाले. तसेच '**Best Technology** ' या करिता पुरस्कार प्राप्त झाला. दि. १७ जानेवारी २०१९ रोजी कर्जत येथे झालेल्या समारंभात पुरस्कार प्रदान करण्यात आला.

२) **"कर्नाड बँकिंग रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशन"** यांच्यातर्फे बँकेचे अध्यक्ष अॅड. सुरेश पटवर्धन यांना '**Best Chairman**' पुरस्कार, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांना '**Best CEO**'दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार, '**Best Recovery Officer**' हा प्रथम पुरस्कार व वार्षिक अहवाल स्पर्धेमध्ये बँकेच्या सन २०१७-१८ च्या **वार्षिक अहवालास प्रथम पुरस्कार** मिळाला आहे. दि. १७ डिसेंबर २०१८ रोजी कोल्हापूर येथे झालेल्या समारंभात सदर पुरस्कार प्रदान करण्यात आले.

३) **"दि. महाराष्ट्र अर्बन को. ऑप बँकस् फेडरेशन"** यांचेतर्फे सन २०१८ करिता '**Best Information Technology**' करिता पुरस्कार प्राप्त झाला. दि. २९ सप्टेंबर २०१८ रोजी झालेल्या कार्यक्रमात फेडरेशन चे अध्यक्ष मा. विद्याधर अनास्कर यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

४) **"बँकिंग फ्रंटियर"** या ख्यातनाम मासिका तर्फे मोठया सहकारी बँकांचे विभागात आपल्या बँकेस '**Best E-Payment Initiative**', '**Best Lending Innovation**', 'Best IT Head' हे पुरस्कार प्राप्त झाले. दि. ०९ सप्टेंबर २०१८ रोजी दिल्ली येथे झालेल्या समारंभात सदर पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

सन २०१९-२० या वर्षाचे व्यवसायाचे अंदाजपत्रक सादर करतांना त्यांनी सांगितले की ठेवी **₹** ३,२०० कोटी व कर्जे **₹** २,२०० कोटी व नफा **₹** २३ कोटी होईल, असा अंदाज आहे. त्यामुळे आपला एकत्रित व्यवसाय **₹** ५४०० कोटींच्या वर होणे, अपेक्षित आहे.

सांघिकरित्या बँकेला वैभव शिखरावर नेणे हेच बँकेचे ध्येय आहे. गेली ४६ वर्षे बँक याच ध्येयाने कार्यरत आहे व यापुढेही याच ध्येयाने आपण कार्यरत राहू असा विश्वास मा. अध्यक्षांनी व्यक्त केला. बँकेच्या कामामध्ये सर्व सभासदांचा सहभाग आम्हांला हवा आहे, असे त्यांनी नमूद केले. सर्व सभासदांना धन्यवाद देऊन दृकश्राव्य माध्यमातील अध्यक्षीय भाषण संपवले.

ठराव सादर करण्यापूर्वी बँकेचे अध्यक्ष मा. ॲड श्री. सुरेश पटवर्धन यांनी बँकेचे माजी संचालक मा. प्रा. श्री. अशोक प्रधान यांना आपले मनोगत व्यक्त करण्याची विनंती केली. आपले मनोगत व्यक्त करताना मा. प्रा. श्री. प्रधान सर यांनी सांगितले की बँकेचा अहवाल मा. अध्यक्ष श्री. सुरेश पटवर्धन यांनी सभेपुढे सादर केला. अहवालामधून बँकेने केलेले काम व बँकेला मिळालेले यश सभेस सांगितले.

सहकारी बँक कल्याणमध्ये काय करु शकते हे लोकांना पटवून देणे खूप कठीण होते. कारण आधीची कल्याण पीपल्स को-ऑप. बँक ही बँक बुडाली होती. त्यामुळे आपली बँक स्थापन करताना लोकांच्या मनात बँक टिकू शकेल का, अशी भीती होती. अवघ्या **₹** ५३००० चे भागभांडवल **₹** २.०० लाखाच्या ठेवींवर सुरु झालेली ही बँक आज मल्टिस्टेट को-ऑप. बँक झाली असून, बँकेचा व्यवसाय **₹** ५००० कोटींचे वर आहे. हे लोकांच्या विश्वासामुळे शक्य झालं. संचालकांनी व भागधारकांनी हा विश्वास लोकांपर्यंत पोहचवला. त्यामुळेच बँक इथपर्यंत येऊन पोचली आहे. बँकेचा नफा वाढत आहे. ठेवी वाढत आहेत. ठेवी वाढण्यास व लोकांचा विश्वास संपादन करण्यास पाच वर्षे लागली. जेव्हा १९७८ साली गायन समाज मध्ये गेली तेव्हापासून बँक झपाटयाने वाढायला लागली. २०१५ साली जेव्हा नवीन संचालक मंडळ आले तेव्हा भागधारकांची संख्या खूप वाढली होती. सुरुवातीच्या **₹** ५३००० च्या भांडवलावरुन बँकेचे भांडवल २०१८ मध्ये **₹** ७६.०० कोटींपर्यंत पोहचले. मागील वर्षात तर भांडवलात **₹** ३४.०० कोटींचा वाढ झाली. शेअर्स घेण्यासाठी ग्राहक आता तयार आहेत कारण त्यांना बँकेविषयी खात्री आहे.

बँकेत Technology खूप महत्वाची आहे. बँकेस Technology चे पुरस्कारही मिळाले. या Technology वर खूप खर्च केला जातो. १९९२ साली सरकारी बँकांमधील युनियनचा बँकांमधील संगणकीकरणास विरोध होता. एकाही सरकारी बँकेत Computerization झालं नव्हतं. पण सरकारी बँकांच्या आधी आपल्या बँकेत Computerization झालं आणि आज Technology मध्ये आपली बँक सरकारी बँकेपेक्षा कुठेही मागे नाही. त्यामुळेच बँकेस Best Technology चे पुरस्कार मिळाले आहेत.

यानंतर NPA बद्दलही त्यांनी विचार सभेपुढे व्यक्त केले. सरकारी बँकांना सरकारकडून Funding केले जाते. आपल्या बँकेच्या संचालकांना हे माहिती आहे की आपल्या बँकेच्या पाठीशी असे कोणी उभे नाही. त्यामुळे ग्राहकांचा पैसा जास्तीत जास्त सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने रिझर्व्हमध्ये मोठया प्रमाणात वाढ केली आहे. त्यामुळे CRAR जो किमान ९% असावा लागतो, तो नेहमी १२% चे वर ठेवलेला आहे. रिझर्व्ह वाढविण्याचा हा एक प्रयत्न आहे.

यानंतर श्री. प्रधान सरांनी उपस्थित सर्व सभासदांना Technology चे फायदे सांगून Technology चा जास्तीत जास्त वापर करण्याचे आव्हान केले. संचालक मंडळानेही Technology चा फायदा जास्तीत जास्त ग्राहक कसे करु शकतील याबाबत विचार करावा. ग्राहकांना प्रशिक्षण द्यावे असेही त्यांनी सुचवले. Technology मुळे अनेक खर्चात कपात होऊ शकते व नफा वाढीस मदत होऊ शकते. अहवाल सालात बँकेने चांगल्या पद्धतीने काम केले आहे. एन्. पी. ए. चे प्रमाण मर्यादित ठेवले आहे. बँकेचे सर्व कर्मचारी अजून चांगल्या पदृध्तीने काम करुन नफा वाढवतील असा विश्वास व्यक्त करुन त्यांनी भाषण संपवले.

**ठराव क्र. २ :** संचालक मंडळाने सादर केलेल्या दि. ३१.०३.२०१९ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल **मा. अध्यक्ष ॲड. सुरेश पटवर्धन** यांनी सभेपुढे वाचून दाखविला. त्याचबरोबर पुढील वर्षाचे अंदाजपत्रक व नवीन व्यावसायिक उद्दिष्टे सभेपुढे मांडली. त्याची ही सर्वसाधारण सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. टी. नागेश्वरराव | सभासद क्र. ४६७३ |
| अनुमोदक : | श्री. राजेंद्र शांताराम नागे | सभासद क्र. ३९५३९ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

यानंतरचा विषय वैधानिक लेखापरीक्षणासंदर्भात असून तो मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी, मा. संचालक सी. ए. सचिन आंबेकर यांना सांगितले.

**विषय :** **वैधानिक लेखापरीक्षकांनी तपासलेला दि. ३१.०३.२०१९ रोजीचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक आणि लेखापरीक्षण अहवाल स्वीकृत करणे. तसेच मागील वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षणाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.**

दृक्‌श्राव्य माध्यमातून विषय सादर करताना श्री. आंबेकर यांनी सुरुवातीला भारतातील बँकिंग क्षेत्राची जी परिस्थिती आहे त्याचा थोडक्यात आढावा घेतला.

विषयास सुरुवात करताना श्री. आंबेकर यांनी सांगितले की ताळेबंद व नफातोटा याबाबतची आकडेवारी मा. अध्यक्षांनी त्यांच्या भाषणांतून सभेपुढे मांडले आहेत. त्यांनी नफातोटा पत्रकात प्रामुख्याने जे बदल झाले त्याबद्दलचा खुलासा सभेत केला. पुढे त्यांनी सांगितले की नोव्हेंबर २०१६ मधील नोटाबंदी व १ जुलै २०१७ रोजी लागू झालेला GST यांचा परिणाम अजूनही काही प्रमाणात सर्व व्यवहारांवर होत असताना दिसत आहे.

गेल्या वर्षी रिझर्व्ह बँकेने राष्ट्रीयकृत बँकेत जी १२ मोठी खाती NPA होती त्यात वसूलीसाठी IBC (Insolvency Bankruptcy Code) अंतर्गत कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. पण वर्षभरात IBC अंतर्गत १२ पैकी फक्त ४ खात्यांमध्ये निर्णय झाला आहे. IBC कडे वसूलीसाठी दाखल करण्यास असलेल्या खात्यांची संख्या वाढल्यामुळे तिथे निर्णय प्रक्रियेत विलंब होत आहे.

सरकारी रोख्यांच्या बाबतीतही सन २०१७-१८ मध्ये जी परिस्थिती होती तीच साधारण सन २०१८-१९ मध्ये दिसत आहे. यामुळे अनेक बँकांना गुंतवणूक घसाऱ्याची तरतूद करावी लागल्याने त्यांच्या नफ्यावर परिणाम झाला आहे. आपल्या बँकेने सन २०१७-१८ प्रमाणे सन २०१८-१९ मध्येही गुंतवणूकीचे नियोजन योग्य प्रकारे केल्याचे ३१ मार्च २०१९ ला रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रामाणे आपल्या बँकेस गुंतवणूक घसारा लागलेला नाही.

बँकिंग क्षेत्रातील सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेताना श्री. आंबेकर म्हणाले की गेल्या वर्षी बँक ऑफ बडोदा, देना बँक व विजया बँक यांचे विलीनीकरण झाले. यावर्षी देखिल १० बँकांचे विलीनीकरण करण्यात येणार आहे.

रिझर्व्ह बँकेने एकूण तीन वेळा रेपो दरात घट केल्यामुळे ठेवींच्या व कर्जांच्या व्याजदरामध्ये घसरण झाली. परिणामी सर्व बँकांमध्ये गेल्यावर्षी ठेवींची वाढ अंदाजे १०% होती तर कर्जाचे वाढ अंदाजे १३ % होती.

रिझर्व्ह बँकेच्या "आर्थिक स्थिरता अहवालात" असे भाकीत वर्तविले आहे की जी अनुत्पादित कर्जे बँकिंग इंडस्ट्रीमध्ये आहेत ती कदाचित या वर्षात कमी होतील.

२०१९ मध्ये आर्थिक मंदी येईल, असा अंदाज वर्तवाला गेलाय. बांधकाम क्षेत्र तसेच वाहन क्षेत्र यावर त्याचे दृश्य परिणाम दिसत आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे या आर्थिक मंदीवर उपाय योजना म्हणून केंद्र सरकारच्या वतीने मा. अर्थमंत्र्यांनी काही सवलती जाहीर केल्यात. या सवलतीमध्ये GST चे दर कमी करणे, कंपन्यांचे आयकर दर कमी करणे या बाबींचा समावेश आहे.

वरील पार्श्वभूमीवर आपण आपल्या बँकेच्या ताळेबंद व आर्थिक प्रगतीचा आढावा घेऊया. सन २०१८-१९ हे आर्थिक वर्ष बँकिंग करिता प्रतिकूल नसले तरी आव्हानात्मक नक्कीच होते. परंतु आपल्या बँकेने ही आव्हानात्मक परिस्थिती सक्षमपणे हाताळली आहे व आपली आर्थिक प्रगती अतिशय उत्तम आहे.

कर्जावरील व गुंतवणूकीवरील व्याज हे बँकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत्र आहे. तर ठेवींवरील व्याज हा बँकेचा मुख्य खर्च आहे. सध्याच्या आव्हानात्मक परिस्थितीत देखिल अहवाल सालात बँकेचे "Net Interest Margin" २.८९% मिळवण्यात बँकेला यश आलेले आहे. कर्जावरील व्याजात १२.८६ कोटीने वाढ झालेली दिसते. तसेच बँकेची कर्जे रु. १०६ कोटींनी वाढली असून गुंतवणूकीच्या रकमेत सरासरी ४० कोटीची वाढ झालेली आहे.

एकूण उत्पन्नात १६ कोटी ६७ लाखाने वाढ झालेली आहे. ठेवींवरील व्याजात रु. १३.३८ कोटींची वाढ झालेली दिसत आहे. ठेवी रु. २२९ कोटीने वाढल्या आहेत. इतर उत्पन्नात जी रु. १७ लाखांची घट दिसत आहे ती मुख्यत: चेक रिटर्न तसेच कमिटमेंट चार्जेस मधील घट झाल्यामुळे आहे. बँकेने विमा व्यवसायातून रु. १ कोटी वर उत्पन्न मिळविले असून सरकारी रोख्यांच्या नफ्यामध्ये रु. १.३६ लाखाने वृद्धी झालेली आहे.

खर्चाचा तपशील मांडताना श्री. आंबेकर यांनी सांगितले की कर्मचाऱ्यांच्या पगारामध्ये जी रु. १.५८ कोटीची वाढ झालेली आहे ती, महागाई भत्त्यामध्ये झालेल्या वाढीमुळे दिसत आहे. तसेच नफातोटा विभागणीमध्ये सानुग्रह अनुदानाकरिता रु. १.१० कोटी रकमेची बँकेने तरतूद केली आहे.

कर्ज वसुलीकरिता वेगवेगळ्या पर्यायांचा वापर केलेला आहे. त्यामध्ये "नॉन बँकिंग ॲसेटस्" या पर्यायाचा आपल्या बँकेने प्रथमच उपयोग केलेला आहे. याबाबत श्री. आंबेकर यांनी सभेला सविस्तर माहिती दिली. या पर्यायाअंतर्गत दोन थकित कर्जदारांची खाती बंद करण्यास आलेली आहेत. "Securitization" अंतर्गत बँकेने आतापर्यंत ५४ कर्जदारांना नोटीस बजावलेली असून वसुलीकरिता पुढील कार्यवाही चालू आहे. गेल्या वर्षीच्या सभेत सांगितल्यानुसार, बँकेने पुणे व कल्याण येथे "Arbitrator" ची नेमणूक केलेली आहे. Arbitration अंतर्गत या वर्षी १०९ दाव्यांची सुनावणी चालू आहे व या माध्यमातून या वर्षभरात रु. ८८.३३ लाख एवढी वसुली करण्यात आलेली आहे. ARC च्या माध्यमातून यावर्षी बँकेने २६ कर्जदारांची खाती बंद केलेली आहेत. त्या पोटी रु. २.५६ कोटीचा तोटा झाला आहे. दोन थकित कर्जदारांच्या विरुद्ध IBC अंतर्गत दावा दाखल केलेला असून त्याची कारवाई सुरु आहे. अशा प्रकारे वरील पर्यायांचा योग्य वापर करुन बँकेने थकित कर्जखात्यांची वसुली केली असल्याबाबत श्री आंबेकर यांनी सांगितले.

मा. श्री. आंबेकर यांनी वैधानिक लेखापरीक्षणाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेताना सांगितले की मे. किर्तने ॲंड पंडित एल. एल. पी. यांनी २०१८-१९ चा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल दि. २३ मे २०१९ रोजी सादर केला आहे. त्यानुसार बँकेने रिझर्व्ह बँकेची परिपत्रक व अन्य कायद्याच्या नियमांनुसार सर्व बाबींची पूर्तता केलेली आहे.

लेखा परीक्षण अहवालात नमूद केलेल्या बाबींचा Compliance Report बहुराज्यीय कायद्यानुसार वैधानिक लेखापरीक्षकांना दि. १४ ऑगस्ट २०१९ ला सादर करण्यात आला आहे व तो नंतर Multistate Co-operative Registrar Delhi यांना सादर करण्यात येईल असे सांगितले.

लेखा परीक्षण अहवालातील काही मुद्दे उदा. RC Book नसणे, तारण मालमत्तेचा, वाहनांचा विमा नसणे, MIDC परवानगी मिळण्यास विलंब लागल्याने तारण मालमत्तेचे गहाणखत प्रलंबित असणे, अशा काही बाबींची पूर्तता होणे बाकी असल्याचे सांगितले. या गोष्टीची पूर्तता होण्यास ठराविक कालावधी लागत असल्याने त्या बाबी लवकरच बँक पूर्ण करुन घेईल असा खुलासा त्यांनी केला.

मे. किर्तने अँड पंडीत एल्. एल्. पी यांनी मागील वर्षीचा म्हणजे २०१७-१८ च्या अहवालाचा दोषदुरुस्ती अहवाल १६ जुलै २०१८ रोजी सादर केला आहे. सन २०१७-१८ चा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल दि. ०४.०८.२०१७ रोजी बँकेस प्राप्त झाला. त्याचा दोषदुरुस्ती अहवाल दि. २६.०९.२०१८ रोजी वैधानिक लेखापरीक्षकांकडे सादर केला. सदर दोषदुरुस्ती अहवाल त्यांच्याकडून तपासून झाल्यावर दि. ०१.१२.२०१८ रोजी Multistate Co-operative Registrar Delhi यांचेकडे पाठविण्यात आला.

सभासद श्री. निळकंठ काळे यांनी प्रश्न विचारला की नफातोटा पत्रकात दुरुस्ती व देखभाल खर्च वेगवेगळा का दाखविला आहे ? जे कंत्राटदार दुरुस्ती करतात त्यांनीच देखभाल करणे आवश्यक आहे.

त्यावर श्री आंबेकर सरांनी उत्तर दिले की देखभाल खर्चामध्ये CCTV, Pest Control, Printer, ATM वगैरेच्या वार्षिक देखभालीसाठी नेमलेल्या कंत्राटांच्या खर्चाचा समावेश असतो जो "दुरुस्ती व देखभाल" या खात्यांतर्गत दर्शविला जातो.

श्री. गणेश काळे यांनी विचारले की गेल्या वर्षीच्या तुलनेत इतर खर्चामध्ये ती रु. १.२३ कोटी रकमेची वाढ झालेली दिसते तर ही वाढ कसली आहे त्याची सविस्तर माहिती द्यावी. यावर श्री. आंबेकर यांनी सांगितले की त्यात वकीलाच्या तसेच इतर Professional Fees चा समावेश असतो. या वर्षी ARC करिता जे Consultancy Charges दिले त्याकरिता झालेल्या खर्चाचा यात समावेश आहे. तसेच इतर खर्चांतर्गत Watch & Ward Charges दिले त्याकरिता झालेल्या खर्चाचा यात समावेश आहे. तसेच इतर खर्चांतर्गत कंत्राटी पद्धतीवर नेमलेल्या कर्मचारी व अधिकाऱ्यांचे पगार, प्रवास खर्च इतर ढोबळ खर्च या सर्व खात्यांच्या रकमा एकत्रितपणे इतर खर्च या खात्यावर दर्शविलेल्या आहेत.

श्री अरुण शिंपी यांनी विचारले की बँकेला मल्टीस्टेट दर्जा दोन वर्षापूर्वी मिळालेला असुनही अजुनही बाहेरील राज्यांमध्ये बँकेने शाखा का उघडली नाही ?

त्यावर उत्तर देताना श्री आंबेकर यांनी सांगितले की रिझर्व्ह बँक सर्व बँकांना नवीन शाखेकरिता लायसेन्स देत असते. परंतु रिझर्व्ह बँक बँकांना लाससेन्स देण्याच्या पॉलीसीचा आढावा घेत आहे. तरी लायसेन्स मिळाल्यानंतर लगेचच वर्षभरात सूरत येथे शाखा उघडण्यात येईल. बँक त्याकरिता रिझर्व्ह बँकेकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहे.

त्यानंतर अध्यक्ष ॲड. पटवर्धन पुढील विषय मांडण्यास उभे राहीले. एक सभासद श्री. उदयकुमार दिक्षित यांनी असंसदीय भाषेत वाद घालत सभेच्या कामात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर सभासद श्री दंडवते यांनी बुडीत निधीच्या तरतुदी विषयी विचारले. तसेच विचारले की संचालकांना भत्ते दिले जात नाहीत असे सांगितले जाते, पण 'संचालकांना भत्ते' हा जमाखर्चात खर्च दिसत आहे.

त्यावर श्री आंबेकर यांनी उत्तर दिले की संशयित बुडीत निधीच्या तरतुदीबाबतची सर्व माहिती अहवालात पृष्ठ क्र. ६७ वर सविस्तरपणे मांडलेली आहे.

संचालकांना देण्यात येणाऱ्या भत्त्यांबाबत श्री आंबेकर यांनी सांगितले की फक्त निवडून दिलेले संचालकच नाही तर स्वीकृत संचालक देखिल कुठल्याही प्रकारचे भत्ते स्वत: करिता वापरत नाहीत. भत्त्यांची रक्कम जरी नफातोटा पत्रकात नांवे टाकण्यात येत असली तरी ती सर्व रक्कम संचालक समाजसेवा पुरस्कार निधी न्यास या न्यासास दिली जाते. तिचा विनियोग समाजोपयोगी कामांकरिता करण्यात येतो.

यानंतर मा. अध्यक्षांनी विषयासंदर्भातील ठराव सभेपुढे मांडला.

**ठराव क्र. ३ :** वैधानिक लेखापरीक्षक मे. किर्तने अँड पंडीत एल. एल. पी यांनी दि. ३१.०३.२०१९ रोजीचा तपासलेला ताळेबंद, नफातोटा पत्रक आणि लेखापरीक्षण अहवाल **मा. संचालक सी. ए. सचिन आंबेकर** यांनी सभेपुढे मांडला व समजावून सांगितला त्यास ही सभा स्वीकृत करीत आहे. तसेच मागील वर्षाचा वैधानिक लेखापरीक्षणाचा दोषदुरुस्ती अहवाल **मा. संचालक सी. ए. सचिन आंबेकर** यांनी सभेपुढे सादर केला. त्याची ही सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. विश्वास गणेश आरेकर | सभासद क्र. १४९८४ |
| अनुमोदक : | श्री. दामोदर विनायक पेंडसे | सभासद क्र. ४३४५७ |

ठराव सर्वानुमते मंजूर.

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. आघारकर यांना सांगितले.

**विषय :** **संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१८-१९ सालच्या नफा वाटणीस मंजुरी देणे.**

मा. संचालक श्री. मोहन आघारकर यांनी २०१८-१९ सालची नफा वाटणी सभेपुढे विस्तृतपणे मांडली. तीव्र स्पर्धा, अनुत्पादित कर्जांमधील वाढ या पार्श्वभूमीवर देखिल आपल्या बँकेने नफा मिळविण्यात सातत्य राखले आहे. भांडवल पुंजी अधिक प्रमाणात सक्षम होण्यासाठी व व्याजदरात होत असलेली घसरण विचारात घेऊन संचालक मंडळाने लाभांशाची शिफारस १२% दराने केलेली आहे.

विविध प्रकारच्या निधींसाठी विभागणी कशा स्वरुपात केली आहे याचे विस्तृत विवेचन श्री. आघारकर यांनी केले. सभासद कल्याण निधीचे विश्लेषणही त्यांनी केले. बँकेचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यासाठी महोत्सव निधीची तरतूद बँक करीत आहे. सभासद व समाजासाठी चांगले उपक्रम राबविण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे असेही सांगितले. लाभांशासाठी तरतूद ₹ ९,२५,००,०००/- एवढी आहे.

ICAI ने AS - ४ ही तरतूद दि. ०१.०४.२०१७ पासून लागू केली आहे. म्हणून लाभांशाची रक्कम ही देणी या सदरात न दर्शविता नफा-तोटा पत्रकात अंतर्भूत केली आहे.

**ठराव क्र. ४ :** सन २०१८-१९ या वर्षात निव्वळ नफा ₹ २०,५४,५२,२४६.०० इतका झाला आहे. संचालक मंडळाने नफा वाटणीस पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे. ती **मा. संचालक श्री. मोहन आघारकर** यांनी सभेसमोर मांडली. सदर नफा वाटणीस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच धर्मादाय निधीचे वितरण करण्याबाबतचे अधिकार संचालक मंडळास देण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

(₹)

| | |
|---|---|
| निव्वळ नफा | २०,५४,५२,२४६.०० |
| मागील शिल्लक | ८,४०,८६,५६१.०० |
| सर्वसाधारण मुक्त निधी | १,००,००,०००.०० |
| **एकूण** | **२९,९५,३८,८०७.००** |
| **वाटणी** | |
| राखीव निधी (२५%) | ५,१५,००,०००.०० |
| सर्वसाधारण मुक्त निधी (१०%) | २,०६,००,०००.०० |
| राष्ट्रीय सहकार शिक्षण निधी (१%) | २०,००,०००.०० |
| लाभांश (२०१७-१८) * | ८,३७,७३,३००.०० |
| गुंतवणूक वध घट निधी | ७०,००,०००.०० |
| धर्मादाय निधी (१%) | २०,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | १०,००,०००.०० |
| महोत्सव निधी | १०,००,०००.०० |
| कर्मचारी सानुग्रह निधी | १,१०,००,०००.०० |
| निवडणूक निधी | ७,००,०००.०० |
| शैक्षणिक निधी | १०,००,०००.०० |
| बुडीत व संशयित कर्ज निधी | २,५४,००,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक** | ९,२५,६५,५०७.०० |
| **एकूण** | **२९,९५,३८,८०७.००** |

** ICAI ने AS - ४ ही तरतूद दि. ०१ एप्रिल, २०१७ पासून लागू केली आहे. सदर तरतुदीनुसार, 'लाभांश' हा देणी या सदरात आर्थिक पत्रकात दर्शविलेला नाही, याचे कारण लाभांश हा वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासद मंजूर करतात. त्यानुसार बँकेने सन २०१८-१९ च्या आर्थिक पत्रकात 'लाभांश देणे' ₹ ९,२५,००,००० हे देणी या सदरात न दर्शविता, नफा-तोटा पत्रकात अंतर्भूत केले आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | सौ. निशा अनिल करमरकर | सभासद क्र. ४३१४७ |
| अनुमोदक : | श्री. संजय पुरुषोत्तम रत्नपारखी | सभासद क्र. १४७६४ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक डॉ. रत्नाकर फाटक यांना सांगितले.

**विषय :** **सन २०१९-२० साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.**

सन २०१८-१९ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरिता तपासनीसांची नेमणूक करण्याबाबतचा ठराव **मा. संचालक डॉ. रत्नाकर फाटक** यांनी सभेपुढे मांडला.

यानंतर मा. अध्यक्षांनी सन २०१९-२० करिता नेमणूक करण्यात आलेले वैधानिक लेखापरीक्षक मे. वैशंपायन ॲन्ड पाध्ये, या फर्ममधील C.A श्री. विवेक कुरमभट्टी व श्री. मोहन भाबे यांचे स्वागत केले. तसेच अहवाल सालातील वैधानिक लेखापरीक्षक मे. किर्तने अँड पंडीत एल्. एल्. पी. चे पार्टनर श्री. अभय जोशी व बँकेचे मुख्य अंतर्गत लेखापरीक्षक श्री. धनंजय गोखले यांची सभासदांना ओळख करुन दिली.

**ठराव क्र. ५ :** सन २०१९-२० साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरीता तपासनीसांची नेमणूक करण्याबाबतचा ठराव **मा. संचालक डॉ. रत्नाकर फाटक** यांनी सभेपुढे मांडला. मे.वैशंपायन ॲण्ड पाध्ये ही फर्म बँकेच्या पॅनलवरील असून मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटीज् ॲक्टच्या कलम ७२ नुसार सर्व अटी पूर्ण करीत आहे. त्यांचा मेहेनताना शासकीय नियमानुसार संचालक मंडळाने ठरवावा.

मल्टीस्टेट सहकारी कायदा २००२ च्या कलम ७० आणि सध्या लागू असलेल्या इतर तरतुदींनुसार सन २०१९-२० साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरीता, या वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेपासून पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेपर्यंत वैधानिक लेखापरीक्षक म्हणून मे.वैशंपायन ॲण्ड पाध्ये यांची नेमणूक करण्यास व नियमानुसार त्यांचा मेहेनताना देण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. गोविंद शिवराम वागे | सभासद क्र. १९०१० |
| अनुमोदक : | श्री. विजय नामदेव भेरे | सभासद क्र. ४७२१२ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

पुढील विषय मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक प्रा. (डॉ.) काणे यांना सांगितले.

**विषय :** **उपविधी दुरुस्तीस मंजुरी देणे.**

मा. संचालक प्रा. डॉ. वसंत काणे यांनी सांगितले की बँकेच्या दैनंदिन कारभार सुकर व्हावा याकरिता वेळोवेळी आपण उपविधी दुरुस्त्या सुचवित असतो. प्रा. काणे यांनी अहवालातील पृष्ठ क्र. ७२ ते ७४ वर छापलेल्या सर्व उपविधी दुरुस्त्या वाचून दाखवल्या व त्यांचे सविस्तर विश्लेषण केले. उपविधी दुरुस्तीची आवश्यकता का भासते व या दुरुस्त्या

करण्याची कारणमीमांसा यांचे सविस्तर विवेचन केले. त्यावर सभासद ॲड. मोटवानी व श्री. शिंपी यांनी प्रश्न विचारले. त्यांना समाधानकारक उत्तरे देण्यात आली.

**ठराव क्र. 6** : बहुराज्यीय सहकारी कायदा २००२ आणि रिझर्व बँकेने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार बँकेच्या कामकाजा मध्ये सुसुत्रता यावी या करीता संचालक मंडळाने उपविधी दुरुस्ती सुचविली आहे. उपविधी दुरुस्ती बाबतचा ठराव **मा. संचालक प्रा. (डॉ) वसंत काणे** यांनी सभेपुढे मांडला व उपविधी क्र. ३(B) (x), ३(B) (xvii), ३(B) (xlii), ११(I), ३४ (II), ३७ (I), ४७ (I), ५०(I)(h), ५१, ५५ मधील दुरुस्ती समजावून सांगितल्या, सदर दुरुस्ती ही अहवालाच्या पान क्र. ७२ ते ७४ वर दिलेली आहे. त्यास ही सभा मंजुरी देत आहे. तसेच उपविधी दुरुस्ती प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी सेंट्रल रजिस्ट्रार, दिल्ली यांचेकडे पाठविणे करीता आवश्यक त्या कागदपत्रांवर सह्या करण्याचे अधिकार अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेपैकी एकास देण्यात येत आहे.

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. हेमंत दरगोडे यांना सांगितले.

**विषय : संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.**

संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे ही भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार आहेत व त्याची कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही, असे श्री. दरगोडे यांनी सांगितले.

**ठराव क्र. ७** : संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबतचा ठराव **मा. संचालक श्री. हेमंत दरगोडे** यांनी सभेपुढे मांडला.

संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे ही भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार आहेत व त्यांची कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही, याची ही सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. आत्माराम बळवंत घाणेकर | सभासद क्र. १४४९७ |
| अनुमोदक : | श्री. निळकंठ रघुनाथ काळे | सभासद क्र. २४९६ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. रमेश गोरे यांना सांगितले.

**विषय : या सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.**

**ठराव क्र. ८** : या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्याचा ठराव **मा. संचालक श्री. रमेश गोरे** यांनी सभेपुढे मांडला. अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती ही सभा क्षमापित करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. राजेंद्र पोपट घोडके | सभासद क्र. ११५८८ |
| अनुमोदक : | सौ. ज्योती विठ्ठल गाढवे | सभासद क्र. १४६२३ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

मा. अध्यक्ष ॲड. श्री. सुरेश पटवर्धन यांनी सभेत सांगितले की श्री. अतुल दीक्षित, श्री राहूल कुलकर्णी, श्री गोविंद वागे, श्री अरुण शिंपी या सभासदांनी बँकेस पत्रे दिली आहेत. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे बँकेने पत्राद्वारे दिलेली आहेत. ज्या सभासदांनी पत्र पाठवून सूचना केल्या त्यांचे अध्यक्षांनी स्वागत केले व त्यानंतर उपाध्यक्ष मा. श्री. मधुसूदन पाटील यांना आभार प्रदर्शन करण्याची विनंती केली.

मा. उपाध्यक्ष श्री. मधुसूदन पाटील यांनी सर्व सभासदांचे आभार मानले. बँकेचे माजी संचालक मा. प्रा. श्री. अशोक प्रधान यांनी त्यांचे मनोगत मांडले तसेच मौलिक मार्गदर्शक केले त्याबाबत त्यांना धन्यवाद दिले. बँकेचे संस्थापक संचालक, माजी संचालक, तसेच काही सभासदांनी प्रश्न विचारले व उपयुक्त सूचना दिल्या याबद्दल त्यांचे आभार मानले. वैधानिक लेखापरीक्षक मे. वैशंपायन ॲण्ड पाध्ये, मे. किर्तने अँड पंडीत एल्. एल्. पी. चे पार्टनर श्री. अभय जोशी, अंतर्गत लेखापरीक्षक श्री. धनंजय गोखले यांचे आभार मानले. सभेसाठी हॉल उपलब्ध करुन देणारे नवरंग बॅंक्वेट हॉलचे व्यवस्थापक व सभेचे चित्रीकरण करणारे श्री. श्रीनिवास लेले, ध्वनीव्यवस्थापक यांचे आभार मानले. तसेच पोलीस कर्मचारी, पत्रकार, बँकेचे एक्झिक्युटिव्ह, अधिकारी, कर्मचारी यांना देखील धन्यवाद दिले.

यानंतर मा. अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहीर केले.